# जागतिक व्यापार संघटना-भारतीय कृषी क्षेत्र

*डॉ. अशोक खाचणे

**जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे :** व्यापार क्षेत्राच्या संबंधातील देशातील लोकांच जीवनमान उंचावणे, वास्तव उत्पन्नात वाढ करणे, परिणामकारक मागणीत वाढ करणे आणि वस्तु व सेवा व्यापार वाढविणे. जागतिक साधनांचा जास्तीत जास्त वापर करणे, त्याचबरोबर स्थैर्यात्मक विकास करणे व आर्थिक विकास साध्य करणे. विकसनशील देशांच्या आर्थिक विकासासाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन त्यांच्या व्यापारात वाढ घडवून आणणे. आंतराष्ट्रीय व्यापारातील संसाधना198मधील भेदभाव करणारे धोरण नाहीसे करणे आणि व्यापारातील जकाती आणि इतर निर्बंध कमी करणे. बहुपक्षीय करारानुसार व्यापारात समन्वय घडवून आणणे व त्यासाठी उत्तेजन देणे. व्यापार पध्दती फायदेशीर आणि टिकाऊ बनविण्यासाठी प्रयत्न करणे. व्यापार धोरणामध्ये परिवर्तनात्मक धोरणे आणि स्थैर्यात्मक विकासासाठी समन्वय साधणे.

**जागतिक व्यापार संघटनेच्या प्रमुख तरतुदी व भारतीय शेती :**

**शेतीविषयक करार :** गॅटचे महासंचालक ऑर्थर डंकेल यांनी शेती व शेती व्यापार याचा प्रथमतः (WTO) मध्ये समावेश केला. रास्त व बाजाराभिमुख शेती व्यापार व्यवस्था निर्माण करण्याचा दीर्घकालीन हेतू सभासद देशांनी मान्य केलेला आहे. सभासद देशांनी कोटयासारखे त्यांचे जकात तर निर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापारावरुन काढून टाकले पाहीजेत. शेतीविषयक तरतुदीचे पुढील तीन भागात वर्गीकरण करण्यात येते.

**शेतमालाचा व्यापार :** गॅट करारांअतर्गत प्रथमच शेती विषयक समाविष्ट करुन कोटा, अंशदाने कमी करण्याचा समावेश केला. डंकेल प्रस्तावानुसार सभासद राष्ट्रांचे विकसित देश, विकसनशील देश व अत्यल्प विकसित देश असे वर्गीकरण करण्यात आले. त्यानुसार विकसित देशांनी ६ वर्षात तर विकसनशील देशांनी १० वर्षात जकातीत घट केली पाहीजे. मात्र अत्यल्प विकसित देशांनी जकातीत घट करण्याचे कारण नाही. या तरतुदीमुळे शेतमालाच्या व्यापारात विस्तार घडून येईल असे मत मांडले.

**i) देशांतर्गत अर्थसहाय्यात घट :** शेतक-यांना दिल्या जाणा-या विविध अर्थसहाय्याचा उल्लेख तीन विभागात केला जातो. पिवळी पेटी अर्थसहाय्य, निळी पेटी अर्थसहाय्य, बहीरणी पेटी अर्थसहाय्य ही ती आहेत. डंकेल प्रस्तावानुसार कृषी उत्पादन मुल्याच्या १० टक्कयापर्यंत अंशदान देता येतो. त्यासाठी देशातील आधार किमंती विचारात घेतल्या पाहिजेत. भारताचे सध्याचे अंशदान आधार किंमतीच्या ५.२ टक्के आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गरिबांना वाजवी किं मतीत अन्नधान्य देण्यास जे अनुदान दिले जाते ते कमी करावे लागणार नाही कारण हा विषय या कराराअतंर्गत येत नाही. **ii) निर्यात अनुदानात घट :** विकसनशील देशाकडुन निर्यातीला जे अनुदान दिले जाते त्यात येत्या ६ वर्षात कपात केली पाहीजे. ती अंदाजपत्रके खर्चाच्या ३६ टक्के व संख्यात्मक दृष्टया २४ टक्के असावी. विकसनशील देशांनी ती १० वर्षात २४ टक्के कपात करायचे होते. **iii) सार्वजनिक वितरण व्यवस्था :** अन्नधन्यावर दिले जाणारे अनुदान हे पोषण उदिदष्टानेच दिले जावे. शासनाने अन्नधान्याचे साठे निर्माण करण्यासाठी बाजारातून चालु किंमतीने धान्य विकत घ्यावे व बाजारकिंमतीपेक्षा कमी किंमतीने विक्री करु नये. देशातील गरजू गरीबांनाच फक्त सवलतीच्या दराने धान्य उपलब्ध करुन द्यावे व त्यावरील अर्थसहाय्य हळुहळू कमी करण्यात यावे. सध्या भारतात या योजने अंतर्गत प्रतिवर्षी २० लक्ष टन अन्न धान्य उपलब्ध करुन दिले जाते. हे एकूण उपभोगासाठी आवश्यक अन्न धान्याच्या १० टक्केपेक्षा कमी आहे. **iv) पेटंटचा अधिकार :** जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार वनस्पती जातीच्या पेटंटला अधिकार संशोधन कार्यात २० वर्षे राहील तो या करारातील व्यापाराशी निगडीत बौध्दिक संपदा अधिकाराबाबत आहे. याचा बनावटपणा व्यापारात होणार नाही. याची दक्षता घेण्यासाठी काही तत्वे, नियम, शिस्त करारात करण्यात आलेली आहे. हा एकाधिकार हक्क बी-बियाणे, खते व इतर नवीन प्रकारचे संशोधन करणा-यांना प्राप्त होईल. एखाद्याने संशोधकाने संशोधन करुन जर एखादे पेटंट किंवा ट्रेडमार्क प्राप्त केल्यास आणि त्यांचा व्यापारासाठी उपयोग करण्यात आला तर संशोधकांना बौध्दीक संपदेचा अधिकार प्राप्त होतो. कृषी व्यवसायात देखील बि बियाणे, जंतुनाशके याबाबत पेटंट घेता येईल. पेटंट घेत असतांना सार्वजनिक हिताच्या नितीच्या व स्वास्थ्याच्या विरोधी असणारे त्याचप्रमाणे मानव, पशू व वनस्पतीच्या सुरक्षिततेला आणि पर्यावरणाला हानी निर्माण करणाऱ्या संशोधनाला पेटंट पध्दतीतून वगळले जाईल. बियाणांची उपलब्धता व त्याचा वापर याबददल शेतकऱ्यांचे हित सुरक्षित केले जाईल.

**जागतिक व्यापार संघटनेचा भारतीय कृषीक्षेत्रावर झालेला परिणाम:** जागतिक व्यापार संघटनेत कृषी विषयक विविध तरतुदी केल्या गेल्यानंतर त्याचा भारतीय शेतीवर पुढीलप्रमाणे अनुकूल व प्रतिकुल परिणाम घडून आला आहे. त्याचा विचार पुढीलप्रमाणे :

**१) कृषी मालाच्या किंमतीत झालेली वाढ :** जागतिक व्यापार संघटनेच्या मुक्त व्यापार धोरणांमुळे किंमत ही स्पर्धेतून ठरत असल्याने त्याचा एक चांगला परिणाम होऊन गव्हाच्या किंमती हया वाढल्यात तसेच कापसाच्या किंमतीसुध्दा वाढल्यात. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे चीन या देशात कापसाची होत असलेली निर्यात होय. यामुळे भारतीय शेतक-यांच्या कृषीमालाला चांगली किंमत मिळत आहे.

**२) औषधे, रसायने व अन्नधान्य उत्पादन याबाबत पेटंट हक्क :** डंकेल प्रस्तावानुसार अन्न पदार्थ, औषधे, रसायने इ. सर्व तांत्रिक उत्पादने अगर प्रक्रिया यासाठी पेंटट मिळु शकतील. त्यापासून मिळणारे २० वर्षे मिळणार आहेत. याबाबत पेटंटचा हक्क नोंदविण्यासाठी १० वर्षाचा कालावधी देण्यात आला आहे. त्यामुळे बहुसंख्य औषधे उत्पादनावर व त्याच्या निर्यातीवर

*प्रपाठक अर्थशास्त्र विभाग, डॉ. अण्णासाहबे जी.डी. बेंडाळे, महिला महाविद्यालय, जळगांव

विशेष परिणाम होणार नाही. त्यामुळे या वस्तुच्या किंमती कमी होतील.

**३) अर्थसहाय्यातील कपात :** अर्थसहाय्यातील घट ही शेती उत्पादनातील आंतरराष्ट्रीय व्यापार उदारीकरणाची पहिली पायरी आहे. उरुग्वे करारानुसार अर्थसहाय्यात कपात करावी लागते. त्यामुळे प्रगत देशांना शेती उत्पादनाच्या निर्यातीतील अर्थसहाय्य घ्यावे लागले व त्यांना ३ % एवढा बाजार आयातीस खुला राहून निर्यात वाढेल म्हणजेच विकसनशील देशांना कृषी माल निर्यात करण्यास अनुकूल परिस्थिती असल्याने कृषी अनुदाने विकसित देशांमध्ये अधिक असल्याने ती कमी करावीत असा प्रयत्न प्रथमच विकसनशील देशांकडून झाला होता. करारातील तरतुदीनुसार अर्थसहाय्याची सीमा रेषा विकसनशील देशासाठी उत्पादन मुल्याच्या १० % निश्‍चित केली आहे. आपले अर्थसहाय्य मुळातच उणे ५.२ % आहे.

**४) व्यापारातील हिस्सा :** जागतिक व्यापार संघटनेमुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिस्सा १९५० साली २ टक्के होता. तो १९९८-९९ च्या जागतिक व्यापार अहवालानुसार १९९० मध्यें ०.५६ % होता. १९९६ मध्ये ०.६० % झाला. २००२ साली ०.६७ % येत्या काही वर्षात जागतिक व्यापारातील वाटा १% करण्याचे उदिदष्ट आहे.

**५) सार्वजनिक वितरण व्यवस्था :** भारतात १९९१ पर्यंत ४५% ग्रामीण लोकसंख्या दारीद्रय रेषेखाली जीवन जगत हेती. या लोकांचे दारिद्रय रेषेतून निर्मुलन करण्यासाठी स्वस्त अन्नधान्याची उपलब्धता, सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून केली जाते. यावर सार्वजनिक विवरण व्यय मोठया प्रमाणावर होतो. या प्रणालीचे भवितव्य जागतिक व्यापार संघटनेमध्ये धोक्यात येईल अशी भिती होती.

**६) मोठी बाजारपेठ :** जागतिक व्यापार संघटनेत झालेल्या बहुपक्षीय व्यापारामुळे भारतातील कृषीमालाला एक मोठी बाजारपेठ प्राप्त झाली आहे. सध्या जागतिक व्यापार संघटनेचे १४९ देश सभासद आहेत. त्यामुळे कृषी मालाची निर्यात २००४-०५ या कालावधीत ३८,०७८ कोटी रुपयापर्यंत आहे. बहुपक्षीय व्यापाराचा हा एक चांगला फायदा आहे.

**ब) प्रतिकूल परिणाम :**

**१) कृषी वस्तूंची निर्यात** जागतिक व्यापार संघटनेमध्ये शेतीला दिल्या जाणा-या अर्थसहाय्याचा वाद प्रमुख विषय ठरला तेव्हा गेल्या दशकातील कृषी वस्तुंच्या निर्यातीची दिशा पाहणे गरजेचे ठरते. भारताच्या कृषी मालाच्या निर्यातीत वृध्दी होत असली तरी एकूण निर्यातीशी त्याची तुलना केल्यास असे दिसून येते की ही निर्यात सातत्याने घटत गेली आहे. १९९७ मध्ये २०.४ टक्के असलेली भारताची कृषी मालाची निर्यात १९९९-२००० मध्ये १४.६ टक्के झाली . ज्या कालावधीत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतमालाच्या व्यापारावर विकसित देशांनी अतिक्रमण केले त्या कालावधीत भारतीय कृषी मालाची निर्यात ६,८२८ कोटी रुपयांवरुन ५,४७५ कोटी रुपयांपर्यंत खाली आली म्हणजेच विकसित देशातील घटकांचा वाईट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेला देखील पचवावा लागलेला आहे.

**२) सिमांत व लहान शेतकरी :** या धोरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात येऊन तेथील बी-बियाणे, खत, किटकनाशके यांचा पुरवठा करतात. त्याप्रमाणेच जागतिक कृषी उत्पादन मिळविण्याच्या दृष्टीने संविधा कृषी व्यवस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करतील. याचाच एक भाग म्हणून लहान शेतकऱ्यांच्या जमीनी आपल्या नियंत्रणाखाली आणून या कंपन्या सांगतील त्या पिकांचा म्हणतील त्या पध्दतीने आणि ठरविलेल्या किंमतीने या लहान शेतक-यांच्या जमीनी आपल्या नियंत्रणाखाली आणून या कंपन्या सांगतील त्या पिकांचा म्हणतील त्या पध्दतीने आणि ठरविलेल्या किंमतीने या लहान शेतक-यांना शेती करावी लागेल म्हणजेच भारतातील लहान शेतक-यांचे अस्तित्व नाहिसे होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

**३) शेती उत्पादनवृध्दी दरातील घट :** शेती उत्पादन वृध्दी दरात घट झाली. १९८१-९१ या कालावधीत हा दर ३.९ % होता तो १९९१ ते २००१ या दशकात १.११ % नी कमी होउन २.८ इतका झाला म्हणजे शेती उत्पादन वृध्दी दरात घट झालेली दिसते.

**४) चीनशी स्पर्धा** : जागतिक व्यापार संघटनेत चीनने नव्याने प्रवेश केला आहे. त्यामुळे भारताला कृषी मालाच्या निर्यात संधीही वाढतील. परंतु हेही लक्षात घ्यावे की, भारतापेक्षा चीनची आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता अधिक आहे. त्यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील काही वाटा चीन घेऊ शकेल ही बाब भारताने लक्षात घ्यावी.

**५) भारतीय शेतक-यांच्या आर्थिक स्थिती :** जागतिक स्पर्धेचा अनुभव हे सांगतो की, जो स्पर्धेस टिकतो तो आर्थिकदृष्टया प्रबळ असतो. शेतक-यांच्या गेल्या दशकातील आर्थिक स्थितीची पाहणी केली असता असे दिसते की, २००२ ते २००४ मध्ये आपल्याला असे दिसून येईल की शेतकरी कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न जे त्याने शेतीतून निर्माण केले ते ११,६२८ रु. होते आणि त्यांचे एकुण वार्षिक उत्पन्न २५,३८० रु. होते. तर शेतीच्या मशागतीवर केलेला खर्च ८,७९१ रु. होता जो दर्शवितो की शेतक-यांनी मिळविलेले उत्पन्न २,८३७ रु. इतक्या अल्पस्वरुपाचे होते. त्याच प्रमाणे शेतकऱ्यांचे एकूण वार्षिक उपभोग खर्च भारतीय शेतकऱ्याने आपल्या कुटुंबावर केला जो एकूण वार्षिक उत्पन्नापेक्षा ७,८६० रुपयांनी अधिक आहे. हि परिस्थिती हे सिध्द करते की, भारतीय शेतकरी कुटुंब अगदी कठीण परिस्थितीत जिवन जगत आहे.

**५) अनुदान तरतुदी अपु-या :** देशातील उत्पादन वाढीसाठी व रोजगार पातळीतील वाढ घडवून आणण्यासाठी अनुदान हा परिणाम करणारा महत्वाचा घटक आहे. कोरडवाहू शेतीत पारंपारिक बियांणाच्या वापराजोगी उच्च पैदास देणा-या बहुपीक पध्दतीचा अवलंब करावा यासाठी अनुदानाचे धोरण आवश्यक ठरते. डंकेल प्रस्तावात शेतमालाच्या एकूण उत्पादन मूल्याच्या १० टक्के अनुदानाची मर्यादा हि फार कमी आहे.

**समारोप** भारत WTO चा संस्थापक सदस्य असल्यामुळे आपली अर्थव्यवस्था WTO च्या नियमानुसार खुली केली आहे. भारत G-२० हया २० देशांच्या समुहाला प्रमुख घटक असतांना भारताला स्वतंत्र भूमिका घेता येणे शक्य नाही. भारताला जागतिक पातळीवर शेती करण्याच्या बाबतीत प्रमुख भूमिका पार पाडून WTO च्या आधीन राहून काही महत्वाचे निर्णय घडवून आणणे गरजेचे आहे की जेणेकरून शेती उद्योग असलेल्या लोकांना भवितव्य राहील.

## संदर्भ ग्रंथ

१) डॉ. बी.डी.कुलकर्णी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र डायमंड पब्लिकेशन पुणे. डॉ. एस.व्ही. ढमढेरे प्रथम आवृत्ती २) रुद्र दत्त, भारतीय अर्थव्यवस्था एस.चाँद ॲण्ड कं. ली. के.पी. एस. सुंदरम ४५ वी आवृत्ती ३) डॉ. जी.एन. झामरे आंतरराष्ट्रीय व्यापार पिंपळापुरे ॲण्ड कं. नागपूर आणि वित्त पब्लिशर्स पहिली आवृत्ती ४) प्रा. अशोक डांगे, जागतिक अर्थव्यवस्था फडके प्रकाशन कोल्हापूर डॉ. विजय ककडे प्रथम आवृत्ती ५) डॉ.विनायक गोविलकर यांचे महाराष्ट्र टाईम्समधील लेख